# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,

३०२,वेक फिल्ड हाऊस,३रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई४००००१.

दूरध्वनीक्र.०२२-२२६९४९८४/८५, Email:dcfmangrovecell@gmail.com/konkanmangroves@gmail.com

**महत्वाचे**

**विषय :- श्री. स्टॅलिन डी, संचालक, वनशक्ती.**
Illegal dumping of waste in CRZ, Pollution of air and water. Illegal sand Mining.
**(तक्रार क्र.२०१)**

जा.क्र./ल. ले/कां.स/ 187 /सन २०२२-२३
फोर्ट, मुंबई - ४००००१ दिनांक:- ०४.१०.२०२२

प्रति,
१. मा.जिल्हाधिकारी,
जिल्हा ठाणे.
२. मा.आयुक्त,
ठाणे महानगरपालिका,
जिल्हा ठाणे.

**संदर्भ:-** श्री. स्टॅलिन डी, संचालक, वनशक्ती यांची दि.२९.०९.२०२२ रोजीची ईमेल द्वारे प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत. (प्रत सलंग्न)

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत श्री. स्टॅलिन डी, संचालक, वनशक्ती यांनी ठाणे महानगरपालिकेद्वारे उल्हास खाडी शेजारी बेकायदेशीरपणे घनकचरा टाकण्यात येत आहे. तसेच जवळील ठिकाणी अवैध वाळू उत्खनन होत असल्याची तक्रार या कार्यालयात प्राप्त झाली असून सदर तक्रार आपणास ईमेलद्वारे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे.

तरी, श्री. स्टॅलिन डी, संचालक, वनशक्ती यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा स्थळ पाहणी अहवाल, पंचनामा, संबंधित जागेचे Geo taged छायाचित्रांसहित माहिती या पुढील बैठकीपूर्वी या कार्यालयात सादर करावा, ही विनंती.

6/10/22

सोबत : वरिलप्रमाणे.

(आदर्श रेड्डी)
सदस्य सचिव,
राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उप वनसंरक्षक
कांदळवन कक्ष, मुंबई.

प्रतिलिपी:- १. अध्यक्ष, कांदळवन संरक्षण व संवर्धन नियंत्रण समिती तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना.

दुरध्वनी :- ०२२-२५४११०५३
०२२-२५४२५६७७

# ठाणे महानगरपालिका, ठाणे

महानगरपालिका भवन, कै.जे.टी.एल. अल्मेडा वकील मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे-४०० ६०२

## THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

संदर्भ : क्र. ठामपा/घकव्य/उपआ- ९४० दिनांक : १०/१०/२०२२

प्रति,
मा. सदस्य सचिव,
राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,
तथा उप वन संरक्षक,
कांदळवन कक्ष,
मुंबई.

**विषय** :- मौजे खर्डी, दिवा येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प चे स्थळ पहाणी अहवाल. व Geo Tagged छायाचित्रांसहित माहिती तसेच मौजे भंडार्ली येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प बाबत वस्तुस्थिती अहवाल.

**संदर्भ** :- १) श्री. स्टॅलिन डी. संचालक, वनशक्ती यांची दि. २९.०९.२०२२ रोजीची ईमेल द्वारे प्राप्त झालेल्या तक्रारींबाबत.
२) आपले पत्र जा.क्र.ल.ले/कां.स/१८७/सन २०२२-२३, दिनांक ०४.१०.२०२२.

मा. महोदय,

ठाणे महानगरपालिकेच्या मौजे खर्डी, दिवा येथील घनकचरा व्यवस्थापन क्षेपणभूमी येथील घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्पासंबंधी दि. २९.०९.२०२२ रोजीच्या ई-मेलद्वारे वनशक्ती संस्थेने केलेल्या तक्रारीच्या संदर्भात स्थळ पाहणी अहवाल, पंचनामा, संबंधित जागेचे Geo Taged छायाचित्रांसहित माहिती सोबत सादर करण्यात येत आहे.

10/10/22

(मनिष जोशी)
उप आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन व प्रकल्प विभाग,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

प्रत :- सब रिजनल ऑफीसर,(एसआरओ-१)
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण विभाग, ठाणे.

Scanned with OKEN Scanner

**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

दिनांक : १०.१०.२०२२

**विषय** :- स्थळ पहाणी अहवाल.

**संदर्भ** :- दि. २९.०९.२०२२ रोजीच्या ई-मेलद्वारे वनशक्ती संस्थेने केलेली तक्रार.

मौजे खर्डी, दिवा येथे खाजगी मालकीचे भूखंड क्र. ३७, ३८, ५०, ५५ व ६१ यावर असलेले मोठे खड्डे बुजविण्याबाबत विनंती स्थानिक रहिवाशांकडून ठाणे महानगरपालिकेस करण्यात आली. त्यानुसार सदर स्थानिकांची मागणीस अनुसरुन व सुरक्षिततेच्या दृष्टीने जिवित वा वित्तहानी टाळण्यासाठी शास्त्रोक्त पध्दतीने घनकचऱ्याची विल्हेवाट लावून खडडे बुजविण्याचे काम हाती घेण्यात आले.

**मौजे डायघर येथील ठाणे महानगरपालिकेचा अत्याधुनिक घनकचरा प्रक्रिया प्रकल्प**

डायघर येथील घनकचरा व्यवस्थापन नियम २००० अन्वये घनकचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणेकामी राज्य शासनाकडून ठाणे महानगरपालिकेस मौजे डायघर येथे १८ हेक्टर क्षेत्रफळाचा भूखंड उपलब्ध झाला आहे. तद्नंतर विहित कार्यपध्दतीनुसार घनकचऱ्यावर प्रक्रिया करणेकामी वेस्ट टू एनर्जी प्रकल्प स्थापन करणेकामी संस्थेची निवड करण्यात आली. दरम्यानच्या काळात घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ मध्ये बदल झाल्यामुळे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्रस्तावित प्रकल्पास घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये २०१८ मध्ये नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले.

मौजे डायघर येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्प पीपीपी तत्वावर राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्याअंतर्गत माहे फेब्रुवारी २०२३ पर्यंत एमआरएफ सुविधा (५० टन प्रतितास क्षमतेचा) प्रकल्प कार्यान्वित करण्यात येईल. याकरीता ठाणे महानगरपालिकेमार्फत सर्व यांत्रिक सुविधांचे (Factory acceptance Test) करण्यात आल्यानुसार सर्व यंत्र जर्मनी तसेच ऑस्ट्रियामधून पाठविण्यात आल्या आहेत.

प्रकल्पाचा दुसरा टप्पा (Waste to Energy Plant) अंतर्गत उर्जा निर्मिती होणार असून त्याकामी मौजे डायघर येथील प्रकल्पामधून उच्च दाबाच्या वीज वाहक वाहिन्या जात असल्याकारणाने त्याचे स्थलांतर करणेकामी MSEDCL विभागास महापालिकेमार्फत २२ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सदरील विद्युत वीज वाहिन्यांचे स्थलांतरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाचा दुसरा टप्पा सुरु करण्यात येणार आहे.

उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेवून, महापालिकेमार्फत मौजे भंडार्ली येथे खाजगी मालकीचा सुमारे १० एकर क्षेत्रफळ असलेला भूखंड भाडे तत्वावर घेण्यात आला आहे.

**मौजे भांडार्ली येथील घनकचरा प्रकीया प्रकल्पाच्या ठळक बाबी :-**

१) खाजगी मालकीच्या १० एकर क्षेत्रफळाच्या भूखंडावर तात्पुरत्या स्वरुपात प्रस्तावित.
२) सदर प्रकल्पामध्ये दैनंदिन स्तरावर निर्माण होणारा १०४० टन घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे.
३) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये तसेच प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्रानुसार प्रकल्प उभारण्याचे कामकाज पूर्ण.
४) मौजे भंडार्ली येथील प्रकल्प दिनांक ०१ ऑगस्ट २०२२ पासून सुरु करण्यात आला आहे. त्यानुसार टप्प्या-टप्प्याने प्रकल्प क्षमतेत वाढ करण्यात येत आहे.
५) दि. ०१ ऑगस्ट २०२२ पासून ते दि. १६ ऑगस्ट २०२२ पर्यंत सदर प्रकल्पात सुमारे ५५० TPD घनकचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात आली. तथापि माहे ऑगस्ट २०२२ या

Scanned with OKEN Scanner

महिन्याच्या तिसऱ्या आठवडयापासून अतिवृष्टी झाल्यामुळे सदर प्रकल्पावर विपरित परिणाम झाला.
सबब, सदरचा प्रकल्प दि. १८ ऑगस्ट २०२२ पासून बंद करावा लागला. नुकसान झालेल्या बाबी खालीलप्रमाणे :-

१) पोहोच रस्ता,
२) MRF मशीन पूर्ण शेड,
३) Waste Receiving Platform
४) पावसामुळे घनकचरा प्रकल्पामधील 80mm पेक्षा मोठया घटकांमुळे MRF मशीनच्या कामकाजावर परिणाम होऊ लागला.
सबब, महापालिकेमार्फत दुरुस्तीच्या सर्व आवश्यक उपाययोजना सुरु करण्यात आल्या आहेत. मौजे भंडार्ली येथील सर्व उपाययोजना माहे नोव्हेंबर २०२२ च्या दुसऱ्या आठवडयापर्यंत पूर्ण करुन प्रकल्प पुनश्च पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात येईल.
**तद्नंतर घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये मौजे दिवा येथील क्षेपणभूमीवरील कामकाज संपवण्यात येईल.**

**मौजे खर्डी, दिवा येथील क्षेपणभूमी शास्त्रोक्त पध्दतीने बंद करणेकामी ठाणे महानगरपालिकेमार्फत खालील उपाययोजना हाती घेण्यात आल्या.**

१) ड्रोन सर्व्हेच्या माध्यमातून Legacy Waste चे एकूण प्रमाण निश्चित करण्यात आले.
२) शासन निर्णय क्र. SMM२०२२/प्र.क्र. ९३/नवि-३४, दि. १०.०८.२०२२ अन्वये महापालिकेस बायो मायनिंग प्रकल्पाकरिता ३७.१० कोटी रुपये मंजूर झाले आहेत.
३) मौजे खर्डी, दिवा येथे ठाणे महापालिकेमार्फत प्रतिदिन ३०० मेट्रीक टन क्षमतेची बायोमायनिंग करीता यंत्र क्षेपणभूमीच्याच ठिकाणी बसविण्यात आले आहे.
सबब, ठाणे महानगरपालिकेमार्फत सन २०२३ अखेर संपूर्ण Legacy Waste शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन त्या परिसराचे Restoration पूर्ण करण्यात येईल.

**थोडक्यात वनशक्ती या संस्थेमार्फत उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात वस्तुस्थिती खालीलप्रमाणे..**

१) मौजे खर्डी, दिवा येथे खाजगी मालकीचे भूखंड क्र. ३७, ३८, ५०, ५५ व ६१ यावर असलेले मोठे खड्डे बुजविण्याबाबत विनंती स्थानिक रहिवाशांकडून ठाणे महानगरपालिकेस करण्यात आली. त्यानुसार सदर स्थानिकांची मागणीस अनुसरुन व सुरक्षिततेच्या दृष्टीने जिवित वा वित्तहानी टाळण्यासाठी शास्त्रोक्त पध्दतीने घनकचऱ्याची विल्हेवाट लावून खडडे बुजविण्याचे काम हाती घेण्यात आले.

**शास्त्रोक्त पध्दतीचे वैशिष्टय :**

- घनकचऱ्याचे सपाटीकरण, त्यावर आवश्यक मातीचा थर, पाणी तसेच लिचेट संकलनाची व्यवस्था करण्यात आली आहे. अस्तित्वातील लिचेट संकलन व्यवस्थेत दैनंदिन स्तरावर संकलित होणारे लिचेट हे महापालिकेच्या सक्शन वाहनांमध्ये त्याचे संकलन व वाहतुक करुन मौजे कौसा येथील एसटीपी प्लांटमध्ये प्रक्रिया करण्यात येत आहे.
- माहे ऑगस्ट २०२२ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे मौजे खर्डी, दिवा येथील क्षेपणभूमीचे कामकाज तसेच तेथे असलेली लिचेट संकलन व्यवस्था विस्कळीत झाली.
- परिणामी महापालिकेमार्फत विस्कळीत झालेली लिचड संकलन व्यवथा पूर्ववत करण्यात आली, त्याअंतर्गत लिचेट वाहण्यासाठी असलेले चर, पाईप्स व टाकी इत्यादींचे दुरुस्तीचे कामकाज तातडीने पूर्ण करण्यात आले.

Scanned with OKEN Scanner

२) ठाणे महानगरपालिकेमार्फत मौजे भांडार्ली येथे खाजगी मालकीच्या १० एकर क्षेत्रफळाच्या भूखंडावर घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये घनकचरा प्रक्रिया प्रकल्प दिनांक ०१ ऑगस्ट २०२२ पासून कार्यान्वित.

➢ सदर प्रकल्पाचे घनकचरा प्रक्रिया क्षमता टप्प्या-टप्प्याने वाढविण्यात आली. त्यानुसार सुमारे ५५० टीपीडी घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत होती.

३) माहे ऑगस्ट २०२२ च्या दुसऱ्या आठवडयापासून झालेल्या अतिवृष्टीमुळे मौजे भंडार्ली येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विस्कळीत झाला.

➢ परिणामी सदरचा प्रकल्प तात्पुरत्या स्वरुपात बंद करावा लागल्याने मौजे खर्डी, दिवा येथील क्षेपणभूमीवर तात्पुरत्या कालावधीकरीता पुनश्च घनकचऱ्यावर प्रक्रिया सुरु करण्यात आली.

**४) मौजे भांडार्ली येथील सर्व उपाययोजना पूर्ण करुन माहे नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवडयापर्यंत पूर्ण क्षेमतेने सदरचा प्रकल्प कार्यान्वित करण्यात येईल व तद्नंतर मौजे खर्डी, दिवा येथील क्षेपणभूमीवर घनकचरा विल्हेवाटीचे कामकाज संपविण्यात येईल.**

**५) माहे डिसेंबर २०२२ च्या पहिल्या आठवडयापासून मौजे खर्डी, दिवा येथे क्षेपणभूमीवर असलेले लेगसी वेस्ट वर बायोमायनिंग पध्दतीने प्रक्रिया करुन सदर परिसराचे रेस्टोरेशन करण्यात येईल. सदरची प्रक्रिया ही डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण करण्यात येईल.**

०१/११/२२.

(मनिष जोशी)
उप आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन व प्रकल्प विभाग,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

सोबत :-

१) मौजे खर्डी , दिवा येथील क्षेपण भूमीच्या मालकीचे कागदपत्र.
२) मौजे खर्डी, दिवा येथील क्षेपणभूमीवर असलेल्या खड्डयांचे गुगल छायाचित्र.
३) मौजे खर्डी, दिवा येथील क्षेपणभूमीवर घनकचरा व्यवस्थापन, लिचेट संकलन व्यवस्था तसेच बायोमायनिंग यंत्र व्यवस्थेचे छायाचित्र.
४) मौजे खर्डी, दिवा येथील क्षेपणभूमी प्रकल्प विस्कळीत झाल्याचे छायाचित्र.
५) शासन निर्णय क्र. SMM२०२२/प्र.क्र. ९३/नवि-३४, दि. १०.०८.२०२२ ची प्रत.
६) मौजे भांडार्ली येथील घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्पाचे छायाचित्र.
७) मौजे भंडार्ली येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या कामकाजात कचरा वेचकांच्या सहभागाची छायाचित्र.
८) मौजे भंडार्ली येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विस्कळीत झाल्याचे छायाचित्र.

Scanned with OKEN Scanner